




पब्लिक ट्रस्ट नं. ई - ३०५ दि. १३-९-१९८५

''ध्येय विकासाचे''

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ

अध्यापक बालकाश्रम, लालटाकी, अहिल्यानगर - ४१४००३




४१ वा

वार्षिक अहवाल

सन २०२५-२०२६


* आधारस्तंभ *



स्व. भानुदास दादा पाटील

शिक्षक नेते

* श्रद्धास्थान *



स्व. चं. भि. धनवटे

संस्थापक, अध्यक्ष,

अ. जि. प्राथ. शिक्षक विकास मंडळ, अ.नगर

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ

''गुरुकुल'' अध्यापक बालकाश्रम, नेहरु पुतळ्यासमोर, लालटाकी रोड, अ.नगर.

(पब्लिक ट्रस्ट नं. ई. ३०५, अहमदनगर दि. १३/९/१९८५)

* वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस *

सन २०२५ - २०२६

(फक्त सभासदांसाठी)

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाची सन २०२५-२०२६ सालची वार्षिक सर्वसाधारण सभा विकास मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. प्रल्हाद मंजाबा भालेकर यांचे अध्यक्षतेखाली रविवार दि. २/८/२०२६ रोजी दुपारी २:०० वा. सुखकर्ता लॉन, कल्याण रोड, बायपास चौक, अहिल्यानगर येथे आयोजित केली आहे. तरी सदर सभेस प्राथमिक शिक्षक विकास मंडळाच्या सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

* सभेपुढील विषय *

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) विकास मंडळाच्या इमारत बांधकामाबाबत निर्णय घेणे.

३) शिक्षक विकास मंडळाचा सन २०२५-२०२६ चा अहवाल व दिनांक १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ अखेरचा ताळेबंद व जमाखर्च यास मंजुरी देणे.

४) सन २०२६-२०२७ करिता लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व मानधन ठरवणे.

५) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

६) समारोप व आभार

- टिप : गणपूर्ती (कोरम) अभावी त्याच ठिकाणी एक तासानंतर सभा घेण्यात येईल.

- स्थळ : अहिल्यानगर.
- दिनांक : २०/०७/२०२६

वार्षिक अहवाल संस्थेच्या www.vikasmandal.in
या वेबसाईटवर उपलब्ध केला आहे.

विश्वस्त मंडळाचे आदेशावरुन

श्री. संतोष रामदास आंबेकर

सचिव

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक मंडळा करिता

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ

''गुरुकुल'' अध्यापक बालकाश्रम, नेहरु पुतळ्यासमोर, लालटाकी रोड, अ.नगर.

(पब्लिक ट्रस्ट नं. ई. ३०५, अहमदनगर दि. १३/९/१९८५)

विश्वस्त मंडळ सन २०२२ ते २०२७

अ.नं.	विश्वस्तांचे नाव	पद	तालुका
१	श्री. भालेकर प्रल्हाद मंजाबा (एम.ए.एम.एड.डी.एस.एम.एम.फील.)	अध्यक्ष	पारनेर
२	श्री. गंभिरे दिलीप गोविंद (बी.ए.डी.एड.)	उपाध्यक्ष	अकोले
३	श्री. आंबेकर संतोष रामदास (एम.ए.एम.एड.सेट)	सचिव	श्रीगोंदा
४	श्रीम. राठोड सुवर्णा किसन (एस.एस.सी.डी.एड)	खजिनदार	पाथर्डी
५	श्री. दळवी प्रदिप फकिरा (एम.ए.डी.एड.)	विश्वस्त	श्रीरामपूर
६	श्री. दिवटे नवनाथ रामचंद्र (एम.ए.डी.एड.)	विश्वस्त	कर्जत
७	श्री. गवळी विलास आनंदराव (बी.ए.डी.एड.)	विश्वस्त	कोपरगांव
८	श्री. शेंडगे संजय गणपत (एम.ए.बी.एड.)	विश्वस्त	संगमनेर
९	श्री. मगर संतोष आनंदा (एम.ए.बी.एड.)	विश्वस्त	नेवासा
१०	श्री. निमसे राजेंद्र भिमराज (एम.ए.एम.एड.)	विश्वस्त	नगर
११	श्री. गमे बाळासाहेब इंद्रभान (बी.ए.डी.एड.)	विश्वस्त	राहाता
१२	श्री. सातपुते मुकुंदराज दशरथ (बी.एस.सी.एम.ए.एम.एड.एस.एम.सी.टी.सी.)	विश्वस्त	जामखेड
१३	श्री. काकडे चांगदेव रघुनाथ (बी.ए.डी.एड.)	विश्वस्त	राहुरी
१४	श्री. गायकवाड गणेश प्रभु (बी.ए.डी.एड.)	विश्वस्त	श्रीगोंदा
१५	श्री. फुंदे दत्तु माधव (बी.ए.डी.एड.)	विश्वस्त	शेवगांव
१६	श्रीम. उगले अनिता मारुती (बी.ए.बी.एड.)	महिला विश्वस्त	अकोले
१७	श्रीम. गाढवे मनिषा शंकरराव (एम.ए.बी.एड.)	विश्वस्त	संगमनेर
१८	श्रीम. राऊत उर्मिला पंढरीनाथ (बी.ए.डी.एड.)	विश्वस्त	राहुरी
१९	श्री. सलिमखान चाँदखान पठाण (एम.ए.बी.एड.)	स्विकृत विश्वस्त	श्रीरामपुर
२०	श्रीम. सरस्वती पुरुषोत्तम घुले (बी.ए.डी.एड.)	पद विश्वस्त तथा चेअरमन प्रा.शि.बँक लि.	
२१	श्री. जगताप सुर्यकांत गोविंद (बी.कॉम, जी.डी.सी ॲण्ड ए, डी.बी.एम.)	पद विश्वस्त तथा मु.का.आ.प्रा.शि.सह.बँक अ.नगर	
२२	श्री. आढाव सुरेंद्र गोकुळदास (बी.एस.सी.)	व्यवस्थापक अ.नगर जि.प्रा.शि.विकास मंडळ अ.नगर.	

।। विना सहकार नाही उद्धार ।।

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ

''गुरुकुल'' अध्यापक बालकाश्रम, नेहरु पुतळ्यासमोर, लालटाकी रोड, अ.नगर.

(पब्लिक ट्रस्ट नं. ई. ३०५, अहिल्यानगर दि. १३/९/१९८५)

४१ वा वार्षिक अहवाल
सन २०२५-२०२६

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाचे सर्व विश्वस्त, पदाधिकारी, मा. सभासद बंधु-भगिनी व निमंत्रित सहकारी

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाच्या सन २०२५-२०२६ सालच्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस आपण सर्वजण अगत्यपूर्वक उपस्थित राहिलात याबद्दल मी आपले सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करतो.

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ हा ट्रस्ट निर्माण करताना आणि नोंदविताना ट्रस्टचे सभासद, त्यांचे कुटूंबिय आणि समाजातील उपेक्षित घटक यांच्याकरिता शैक्षणिक, सांस्कृतीक, सामाजिक उपक्रम राबविता यावेत हा विचार घेऊन अशाप्रकारचा उद्देश घटनेमध्ये समाविष्ट केला आहे.

याप्रमाणे २०२५-२०२६ अहवाल सालात विश्वस्त मंडळाने सदरचा उद्देश अंमलात आणण्याकरीता प्रामाणिक प्रयत्न करुन समाजात शिक्षकांची प्रतिष्ठा वाढवण्याकरिता योगदान दिलेले आहे.

प्राथमिक शिक्षकांचे श्रद्धास्थान कै. भानुदास दादा पाटील व स्व. चं. भि. धनवटे यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करुन तसेच अहवाल सालात दिवंगत झालेले राजकीय क्षेत्रातील थोर मान्यवर, सहकार, शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते, शिक्षक बँकेचे माजी संचालक, सभासद, विकास मंडळाचे माजी विश्वस्त व सभासद, बंधु-भगिनी तसेच विविध नैसर्गिक आपत्तीत स्वर्गवासी झालेल्या बांधवांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करुन विश्वस्त मंडळाचे वतीने सन २०२५-२०२६ या वर्षातील कामकाजाचा अहवाल मी सभागृहापुढे मान्यतेसाठी सादर करीत आहे.

आपला विश्वासू

श्री. प्रल्हाद मंजाबा भालेकर

अध्यक्ष

अहमदनगर जिल्हा प्राथ. शिक्षक विकास मंडळ

।। विना सहकार नाही उद्‌धार ।।

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ

''गुरुकुल'' अध्यापक बालकाश्रम, नेहरु पुतळ्यासमोर, लालटाकी रोड, अ.नगर.

(पब्लिक ट्रस्ट नं. ई. ३०५, अहमदनगर दि. १३/९/१९८५)

महोदय,

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाचा सन २०२५-२०२६ या वर्षाचा अहवाल माझे सर्व सहकारी व विश्वस्तांचे वतीने आपणासमोर सादर करीत आहे.

मुंबई सार्वजनिक न्यास कायदा कलम १९५० अन्वये आपल्या अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ या विश्वस्त संस्थेची दिनांक १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ या आर्थिक हिशोब वर्षाची माहिती अहवालात दिलेली आहे. मा. पी. के. वाघ, चार्टर्ड अकौंटंट, अहमदनगर यांनी विश्वस्त मंडळाचा जमा-खर्च तपासून प्रमाणित केला आहे. अहवाल सालात विश्वस्त मंडळाच्या आवश्यकते प्रमाणे सभा घेण्यात आलेल्या आहेत.

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाचे गट क्र. १५०/१ ब वर ५१.२४ आर एवढे क्षेत्र अहमदनगर शहराच्या मध्यभागी लालटाकी रोड, या हमरस्त्यावर आहे. या क्षेत्रावरील इमारत व जागेचा अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ या नावाने पब्लिक ट्रस्ट नं. ई-३०५, अहमदनगर दिनांक १३/९/१९८५ अन्वये ट्रस्ट डीड करण्यात आला. मा. धर्मदाय आयुक्तसाहेब व सहकार खाते यांच्या सर्व अटी व नियमांचे पालन करुन त्यांच्या परवानगीने या न्यासाचे सर्व व्यवहार दि. ३०/०७/१९८७ रोजी शिक्षक विकास मंडळाकडे रितसर वर्ग झाले आहेत.

*** गुरुकुल इमारत :**

आपल्या विश्वस्त संस्थेने उभारलेल्या गुरुकुल इमारतीसाठी सभासदांनी शिक्षक विकास मंडळावर फार मोठा विश्वास दाखवून ठेवी ठेवलेल्या आहेत. म्हणूनच अहिल्यानगर शहराच्या मध्यभागी गुरुकुल ही भव्य वास्तू साकारली आहे. गुरुकुल उभारणीत व ट्रस्ट डीड करण्यात ठेवीदार, सभासद बंधू-भगिनींचा सिंहाचा वाटा आहे.

या इमरातीत तळमजल्यावर ११ गाळे व मजला नं. १ वर ११ गाळे असे एकुण २२ गाळे आहेत.

मजला नं. २ वर अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक शाखा-नगर तालुका यांचे कार्यालय, आणि इतर ४ ऑफीसेस, मजला नं. ३ वर बँक ऑफ महाराष्ट्र क्षेत्रीय कार्यालय असे एकुण २७ भाडेकरु आहेत.

शिक्षक विकास मंडळाचे परवानगी शिवाय कोणत्याही भाडेकरुला भाडेकराराने घेतलेला गाळा दुसऱ्या भाडेकरुंना हस्तांतर करता येत नाही किंवा पोटभाड्याने देता येत नाही.

प्राथमिक शिक्षक विकास मंडळाचे गुरुकुल इमारत उभारण्याकरिता व विविध योजनेसाठी त्या काळातील सभासदांनी मोठा त्याग करुन विकास मंडळाकडे प्रत्येकी रु. १००० (अक्षरी रु. एक हजार मात्र) याप्रमाणे ठेवी ठेवलेल्या आहेत.

* नियोजित विकास मंडळ संकुलाबाबत :

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाची जागा ही लालटाकी या गजबजलेल्या भागात आहे. या रस्त्यावर अनेक संस्थांच्या इमारती व इतर अनेक उद्योगधंदे आहेत. नगर शहराचा वाढता विस्तार होत असताना हि जागा मध्यवर्ती ठिकाणी आहे. अहमदनगर जिल्ह्यातील नागरीकांच्या गरजा पूर्ण करणारे भव्य असे व्यापारी संकुल उभारण्याचा विश्वस्त मंडळाचा मानस आहे. विकास मंडळाला उत्पन्न वाढवून या संस्थेला अधिकाधिक आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करुन अधिक प्रमाणात समाजोपयोगी कामे करुन संस्थेची उन्नती करण्याचा विश्वस्त मंडळाचा मानस आहे, या कामी सर्व सभासदांचे सहकार्य अपेक्षित आहे.

* भविष्यातील योजना

१) अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाच्या माध्यमातुन दुर्धर आजारग्रस्त प्राथमिक शिक्षक सभासदांना भरीव आर्थीक मदत करणे.

२) मयत सभासदांना आर्थिक मदत करणे.

३) समाजातील उपेक्षीत घटकांमधील गुणवंत विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी मदत करणे.

* विकास मंडळाच्या ठळक बाबींवर दृष्टीक्षेप

विकास मंडळाचे उत्पन्न करमुक्त करण्यासाठी १२ अ (३) चा प्रस्ताव नाशिक व पुणे विभागीय कार्यालयात सादर केला होता. त्यानुसार पुणे विभागीय आयकर आयुक्तांनी दि. २७ जून २०१८ रोजी नं. PN/CIT(Exemp) /Tech/12AA/A'bad Rg./844/204/2017-18/1578 अन्वये संस्थेला प्रमाणपत्र प्रदान केले आहे. उपरोक्त बाब संस्थेच्या आर्थिक हिताकरिता अत्यंत महत्वाची आहे.

* विकास मंडळ नियोजीत संकुलास ३६ अ (३) अन्वये मा. सहा. धर्मदाय आयुक्त पुणे विभाग यांची मंजुरी मिळवण्याकामी यशस्वी पाठपुरावा व सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करण्यात यश.
* विकास मंडळाचे सर्व आर्थिक व्यवहार रोखीने किंवा हातावर करण्यास पूर्णपणे निर्बंध.
* कॅशलेस व्यवहारांना चालना, फक्त चेकनेच व्यवहार.
* इमारत ठेवीदारांच्या ठेवी त्यांच्या खाती चेकनेच जमा करण्याच्या ठरावावर अंमलबजावणी केली आहे.
* विकास मंडळाची अकृषक थकबाकी महसूल कर एकरकमी भरणा करण्यात आला.
* महापालिका कराचा एप्रिलपुर्वीच संपूर्ण भरणा
* विविध सामाजिक संस्थाना उपयोगी साहीत्य व धान्यवाटप उपक्रम राबवला तसेच जिल्ह्यातील दुर्गम, डोंगराळ भागातील जिल्हा परिषद तसेच प्राथ. शाळांमधील मुलींना शुज सॉक्स व शालेय साहित्य वितरण.
* संस्थेचा नियमित ऑडिट अहवाल मा. सहा. धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे सादर केलेले आहेत.
* ट्रस्टचे आय.टी.आर. रिर्टन आयकर खात्याकडे परिपूर्णपणे भरलेले आहेत.
* गाळेधारकांचे करार फक्त ३५ महिन्यांचे करण्यास बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये बंधनकारक.

* अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाची निती आयोगाकडे नोंदणी झाल्यामुळे (एम.एच./२०१९/०२३९५६१) हा युनिक आय.डी. संस्थेला प्राप्त झाला.
* अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाची www.vikasmandal.in ही अधिकृत वेबसाईट सुरु झाली आहे.
* विकास मंडळाच्या वतीने इतर समाजिक संस्था यांना आर्थिक तसेच गरजू, अनाथ, विद्यार्थ्यांना मदत करण्यात येईल.

* अभिनंदन :

अहवाल सालात ज्या सभासद बंधू भगिनींनी स्पर्धा परीक्षेत यश संपादन केले, ज्यांना मुख्याध्यापक, पदवीधर, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकार पदावर पदोन्नती मिळाली तसेच तालुका, जिल्हा राज्य व राष्ट्रीय पातळीवर आदर्श शिक्षक पुरस्कार व इतर सन्माननीय पुरस्कार प्राप्त केले अशा सर्व सभासदांचे तसेच सर्व नगरपालिका व भिंगार कॅन्टो. प्राथमिक शाळेतील आदर्श शिक्षक पुरस्कृत सभासदांचे मनःपूर्वक अभिनंदन.

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळातील विश्वस्त व सभासदांच्या पाल्यांनी पूर्व माध्य. व माध्य. शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय विद्यालय परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षेत मिळविलेल्या विशेष प्राविण्याबद्दल हार्दिक अभिनंदन. त्याचबरोबर शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन...!

* आभार :

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाच्या कामकाजात अध्यक्ष व कार्यकारिणी, अहमदनगर जिल्हा प्राथामिक शिक्षक संघ, गुरुमाऊली मंडळ, उच्चाधिकार समिती, केंद्रप्रमुख संघ, जिल्हा महिला आघाडी, कला व सांस्कृतिक मंडळ, पदवीधर संघ, न.पा. संघ, तंत्रस्नेही मंडळ, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ व ऐक्य मंडळ, शिक्षक भारती, एकल शिक्षक मंच, परिवर्तन मंडळ व स्वराज्य मंडळ, शिक्षक बँकेचे सर्व संचालक, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त साहेब व कर्मचारी, संस्थेचे कायदेशीर चॅरिटी सल्लागार ॲड. जयदिप देशपांडे, कायदेशीर सल्लागार–ॲड. अमोल गावडे, ॲड. अनुराधा येवले, लेखापरिक्षक–मे. पी. के. वाघ ॲण्ड कंपनी, विकास मंडळाचे व्यवस्थापक श्री. सुरेंद्र आढाव व कर्मचारी या सर्वांचे जाहीर आभार व कृतज्ञता. संस्थेचे सर्व उपक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेस तन,मन,धन पूर्वक सहकार्य करावे. मौलिक सूचना व कार्याविषयी मार्गदर्शन करावे. ही विनंती.

मा. विश्वस्त मंडळाचे वतीने ४१ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद, जमा–खर्च पत्रक आपल्या मंजुरीसाठी सादर करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी ही नम्र विनंती.

सर्वांचे पुनश्च मनःपुर्वक आभार !

आपला विश्वासू

श्री. प्रल्हाद मंजाबा भालेकर

अध्यक्ष

अहमदनगर जिल्हा प्राथ. शिक्षक विकास मंडळ

ठिकाण : अहमदनगर.

दिनांक : २०/०७/२०२६

विकास मंडळ सभासदांची ठेव परत दिल्याची माहिती

अ.क्र.	सभासदाचे नांव	तालुका	ठेव रक्कम	ठेव परत दिल्याचा दिनांक	ठेव परत देण्याचे कारण
१.	श्री. चाचर प्रभाकर गणपतराव	शेवगांव	५०,०००/-	०२/०८/२०२५	सेवानिवृत्त
२.	श्री. घुमरे अशोक बापुराव	शेवगांव	१०,०००/-	०१/१०/२०२५	सेवानिवृत्त
३.	श्री. गोरे निवृत्ती आण्णासाहेब	शेवगांव	१०,०००/-	०१/१०/२०२५	सेवानिवृत्त
४.	श्रीम. डिसले राधा बिभिषण	जामखेड	१०,०००/-	०१/१०/२०२५	सेवानिवृत्त
५.	श्री. कोरडे एकनाथ किसन	पारनेर	२५,०००/-	११/१०/२०२५	सेवानिवृत्त
		एकूण	**१,०५,०००/-**		

भावपूर्ण श्रद्धांजली

अहवाल सालात अनेक देशभक्त,
स्वातंत्र्य सेनानी, थोर नेते, लेखक, संशोधक,
कवी, साहित्यिक, कलावंत, शास्त्रज्ञ, सैनिक,
तंत्रज्ञ, तज्ञ खेळाडू, सामाजिक व सहकारी क्षेत्रातील
कार्यकर्ते, विकास मंडळाचे सभासद, ठेवीदार,
हितचिंतक दिवंगत झाले
त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती
व सद्‌गती देवो ही ईश्वर चरणी प्रार्थना...



* स्थानिक लेखा परिक्षकांचा अहवाल *

मी अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ, अहिल्यानगर या संस्थेचा सोबत जोडलेला दि. ३१/०३/२०२६ या दिनांकाचा ताळेबंद व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या वर्षाचे नफा तोटा पत्रकाचे लेखापरिक्षण केले असून अहवाल करतो की,

१) माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत.

२) माझ्या मते पुस्तकाच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९३२ नुसार त्याखालील नियम संस्थेचे पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) मी तपासलेल्या ताळेबंद व नफा तोटा पत्रक संस्थेच्या पुस्तकांशी व विवरणाशी जुळत आहे.

४) माझ्या मते आणि माझे माहितीप्रमाणे तसेच मला देण्यात आलेल्या खुलाशावरुन हे हिशोब बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९३२ नुसार त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात.

   अ) ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/०३/२०२६ ची सांपत्तीक स्थिती

   ब) उत्पन्न व खर्च पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या अगर मुदतीच्या संस्थेच्या वाजवी तुटीची सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

स्थळ : अहिल्यानगर

दिनांक : २७/०६/२०२६

पी. के. वाघ ॲण्ड कंपनी
सनदी लेखापाल
अहिल्यानगर.

अहमदनगर जिल्हा प्राथमिक

ताळेबंद पत्रक

३१/३/२०२५	भांडवल व देयता		३१/३/२०२६
५,००,०००.००	भागभांडवल		५,००,०००.००
३०,०७,९९८.००	घसारा निधी		३०,५५,३३०.००
	मागील	३०,०७,९९८.००	
	चालू	४७,३३२.००	
२१,००,१५०.००	सभासद वर्गणी		
	मागील	२१,००,१५०.००	
	वजा परतफेड	०.००	२१,००,१५०.००
५,७१,२६०.००	सभासद ठेवी		
	मागील	५,७१,२६०.००	५,७१२६०.००
	वजा परतफेड	०.००	
२२,६३,४६२.००	गाळे डिपॉझीट		२२,६३,४६२.००
८६,९०,८००.००	नवीन इमारत डिपॉझीट		
	मागील	८६,९०,८००.००	
	वजा परतफेड	१,०५,०००.००	८५,८५,८००.००
२,२०,५००.००	इलेक्शन डिपॉझीट		२,२०,५००.००
१,७३,५४,१७०.००	एकूण		१,७२,९६,५०२.००

शिक्षक विकास मंडळ, अहिल्यानगर

दि. ३१ मार्च, २०२६ रोजीचे

३१/३/२०२५	मालमत्ता व येणी		३१/३/२०२६
१,३१,७४,२२९.००	स्थिर मालमत्ता		१,३१,७४,२२९.००
	नवीन इमारत बांधकाम	५५,७५,१९१.००	
	इमारत क्र. २	३२,३२,९९७.००	
	वॉल कंम्पा.	२,४८,३२९.००	
	नवीन इमारात म्युनि. टॅक्स	४१,१७,७१२.००	
६२,७२५.००	डेडस्टॉक		५६,४५२.००
८,१४०.००	कॉम्प्युटर प्रिंटर		७,३२६.००
९१,१८०.००	डिपॉझीट		९१,१८०.००
	टेलिफोन	४,३००.००	
	इले. मिटर नं. १ (४५४)	७५०.००	
	इले. मिटर नं. २ (४८६)	८६,१३०.००	
६,२१,९५०.००	निवडणुक खर्च		६,२१,९५०.००
७०,६१०.००	आयकर येणे		३७,३९४.००
८१,६९०.००	कॅश व बँक		३५,६८१.००
	बँक ऑफ महाराष्ट्र	२,४७०.००	
	खाते नं. ०१	३,१२९.००	
	खाते नं. ०२	३०,०८२.००	
३२,४३,६४६.००	उत्पन्न व खर्च खाते		३२,७२,२९०.००
	मागील तोटा	३२,४३,६४६.००	
	+ चालू तोटा	२८,६४४.००	
१,७३,५४,१७०.००	एकूण		१,७२,९६,५०२.००

अहमदनगर जिल्हा प्राथमिक


नफा-तोटा पत्रक

३१/३/२०२५	खर्च	३१/३/२०२६
३६,०००.००	विश्वस्त मंडळ मिटींग व बैठक भत्ता	०.००
८,४००.००	वेवबसाईट	०.००
५५,६४४.००	लाईट बील	५७,९३०.००
५२,९५७.००	म्युनि. टॅक्स	६६,५२१.००
२,६६,५००.००	सेवक वेतन बोनस	२,६६,५००.००
१४,६५०.००	रिपेअर मेंटनन्स व साफसफाई	२२,४५०.००
११,०५०.००	प्रिंटींग व स्टेशनरी	८,१६५.००
१९,२०५.००	इलेक्ट्रीकल रिपेअर्स	१३,२२०.००
१,०९७.००	बँक कमिशन	१,२४९.००
०.००	ऑडीट फी	१५,०००.००
५०००.००	दिंडी भोजन	५०००.००
६,०१,६५०.००	सभासद व डिपॉझिट व्याज	५,९४,३००.००
८४,२००.००	वकील फी	२५,०००.००
३०,३४१.००	वार्षिक सभा	१६,२००.००
२७,०४४.००	किरकोळ खर्च	४,५७७.००
५२,५९२.००	घसारा इमारात क्र. २	४७,३३२.००
९०५.००	कॉम्प्युटर	८१४.००
६,९७०.००	डेडस्टॉक	६,२७३.००
०.००	आर्किटेक्ट फी	७,०००.००
०.००	शैक्षणिक खर्च	५०,०००.००
१२,७४,२०५.००	एकूण	१२,०७,५३१.००

शिक्षक विकास मंडळ, अहिल्यानगर

दि. ३१ मार्च २०२६ रोजीचे

३१/३/२०२५	उत्पन्न	३१/३/२०२६
१०,९९,९५९.००	इमारत भाडे	११,६३,२८७.००
३०००.००	बँक व्याज	०.००
१६,१००.००	मेंबरशिप फी	१५,६००.००
१,५५,१४६.००	तुट	२८,६४४.००
१२,७४,२०५.००	एकूण	१२,०७,५३१.००



"वेळ जात नाही म्हणून एखादी गोष्ट करण्यापेक्षा
अशा एखाद्या गोष्टीला वेळ द्यावा जी
आपली वेळ बदलू शकेल."

* विश्वस्त मंडळ *



श्री. प्रल्हाद भालेकर
अध्यक्ष
(पारनेर)



श्री. दिलीप गंभिरे
उपाध्यक्ष
(अकोले)



श्री. संतोष आंबेकर
सचिव
(श्रीगोंदा)



श्रीम. सुवर्णा राठोड
खजिनदार
(पाथर्डी)



श्री. प्रदिप दळवी
विश्वस्त
(श्रीरामपुर)



श्री. नवनाथ दिवटे
विश्वस्त
(कर्जत)



श्री. विलास गवळी
विश्वस्त
(कोपरगांव)



श्री. संजय शेंडगे
विश्वस्त
(संगमनेर)



श्री. संतोष मगर
विश्वस्त
(नेवासा)



श्री. राजेंद्र निमसे
विश्वस्त
(नगर)



श्री. बाळासाहेब गमे
विश्वस्त
(राहाता)



श्री. मुकुंदराज सातपुते
विश्वस्त
(जामखेड)



श्री. चांगदेव काकडे
विश्वस्त
(राहुरी)



श्री. गणेश गायकवाड
विश्वस्त
(श्रीगोंदा)



श्री. दत्तु फुंदे
विश्वस्त
(शेवगांव)



श्रीम. अनिता उगले
विश्वस्त
(अकोले)



श्रीम. मनिषा गाढवे
विश्वस्त
(संगमनेर)



श्रीम. उर्मिला राऊत
विश्वस्त
(राहुरी)



श्रीम. सरस्वती घुले
पदसिद्ध विश्वस्त, चेअरमन
अ.जि.प्रा.शि.बँक



श्री. सलीमखान पठाण
स्वि. विश्वस्त
(श्रीरामपुर)



श्री. सुर्यकांत जगताप
पदसिद्ध विश्वस्त,
मु.का.अ.शि. बँक



श्री. सुरेंद्र आढाव
व्यवस्थापक
अ.जि.प्रा.शि. विकास मंडळ



* आपल्या जुन्या स्मृती *



अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाच्या वतीने दरवर्षी येणाऱ्या त्र्यंबकेश्वर दिंडी सोहळ्याच्या आगमनानिमित्त दिंडीचालक ह.भ.प. काशिनाथ महाराज मोरे, ह.भ.प. सुधाकर महाराज नरवडे, ह.भ.प. सुभाष महाराज चिने व दिंडी वारकरी यांच्या सत्कार प्रसंगी शिक्षक नेते व मार्गदर्शक श्री. बापूसाहेब तांबे, गुरुमाऊली मंडळाचे जिल्हाध्यक्ष श्री. संतोष दुसुंगे, विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रल्हाद भालेकर, सचिव श्री. संतोष आंबेकर, विश्वस्त श्री. राजेंद्र निमसे, श्री. संतोष मगर, शिक्षकनेते श्री. नारायण पिसे, श्री. संदिप ठाणगे, व्यवस्थापक श्री. सुरेंद्र आढाव, गुरुमाऊली सदिच्छा व शिक्षक मित्रपरिवार

* प्रकाशक *

श्री. प्रल्हाद मंजाबा भालेकर

अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ

अध्यापक बालकाश्रम, अप्पू चौक, लालटाकी रोड, अहिल्यानगर